
मेळघाट
ऐतिहासिक ठेवा...
आदिवासी संस्कृती...
निसर्गसंपन्न भूमी!



कॅमेरा ट्रॅपसमोर उभे राहून स्वतःचे छायाचित्र काढून घेणारा मेळघाटातील वाघ

छायाचित्र - मेळघाट व्याघ्र प्रकल्प फोटो स्टॉक

सातपुडा - मैकल या भूप्रदेशातील सातपुडा पर्वत रांगांच्या कुशीत वसलेले मेळघाट म्हणजे ठायी ठायी विखुरलेला पौराणिक-ऐतिहासिक ठेवा आणि आदीम आदिवासी संस्कृती असलेला निसर्ग संपन्न प्रदेश! मेळघाट म्हणजे घाटांचा मेळ. सर्वदूर पसरलेल्या विस्तीर्ण पर्वतरांगा, उंचच उंच पर्वत शिखरे, नजर पोहचू शकणार नाही अशा खोल दऱ्या, दऱ्याखोऱ्यातून खळखळत वाहणाऱ्या नद्या आणि नजर टाकाल तेथपर्यंत पसरलेले घनदाट जंगल हे मेळघाटचे वैशिष्ट्य! येथील जंगल जैवविविधतेने अत्यंत नटलेले आहे. अनेक दुर्मीळ वनस्पती आणि दुर्मीळ वन्यप्राण्यांचे हे अधिवास आहे!

## पौराणिक संदर्भातून....

महाभारतातील अनेक प्रसंगांचा संबंध मेळघाटातील चिखलदऱ्याशी जोडला गेला आहे. पांडव अज्ञातवासात असताना वेषांतर करून ज्या विराट राजाच्या नगरीत राहत ती विराट नगरी, भीमाने वध केलेला कीचक, वध करून कीचकाला ज्या दरीत टाकले ती कीचकदरा (चिखलदरा) हे सर्व येथीलच. वध केल्यानंतर भीमाने हात धुतले तो कुंड (भीमकुंड) इथेच आहे.



सातपुडाच्या पर्वतरांगा



नरनाळा किल्ला

## इतिहासाच्या पानातून...

मेळघाटात तसेच त्याच्या लगतच्या परिसरात ऐतिहासिक ठेवा असलेले अनेक किल्ले आज पहावयास मिळतात. इ.स. १२६० ते १२९४ या कालखंडात देवगिरीच्या यादव (गवळी) कुळातील राजांची सत्ता सातपुड्यावर होती. याच कालखंडात मेळघाटातील चिखलदऱ्याचा गाविलगड (गवळीगड) किल्ला बांधला गेला असे मानले जाते. याच दरम्यान मेळघाटातील नरनाळा किल्ला देखील बांधला असावा. त्यानंतर इ.स. १३४७ पर्यंत या प्रदेशावर अल्लाउद्दीन खिलजीचे साम्राज्य होते. इ.स. १३४७ नंतर बहामनी सुलतानाची सत्ता स्थापन होऊन मेळघाटातील नरनाळा आणि गाविलगड हे किल्ले त्यांच्या ताब्यात गेले.

पुढे इ.स. १४९०मध्ये फत्तेउल्ला इमादउलमुल्क याने स्वतंत्र इमादशाही स्थापन करून हा परिसर ताब्यात घेतला. अखेर इ.स. १५७२ला इमादशाहीचा अस्त होऊन संपूर्ण परिसराबरोबरच हे किल्ले निजामाच्या अंमलाखाली आले. पुढे इ.स. १५९८मधे निजामशाहीचा अस्त झाला आणि हा प्रांत मोगलांच्या ताब्यात गेला. इ.स. १७०४ नंतर या संपूर्ण प्रदेशावर मराठे, पेशवे, नागपूरकर भोसले अशा सत्ता वेळोवेळी राज्य करीत राहिल्या. अखेरीस इ.स. १८२२मध्ये हा प्रांत इंग्रजांच्या ताब्यात गेला.

मेळघाटातील नरनाळा आणि गाविलगड या दोन्ही किल्ल्यांना इतिहासाच्या पानात खूप महत्त्वाचे स्थान होते. आजही या किल्ल्यांच्या भग्न अवशेषातून आपल्या देशाचा प्राचीन, अमूल्य सांस्कृतिक ठेवा अनुभवता येतो.



गाविलगड किल्ला

## ब्रिटिश कालखंडात...

इ.स. १८२२मध्ये नरनाळा आणि गाविलगडावर ब्रिटिशांनी ताबा मिळविला आणि त्याबरोबर मेळघाटात त्यांचा प्रवेश झाला. पाठोपाठ इ.स. १८२३मध्ये ब्रिटिशांच्या हैद्राबाद प्लॅटूनचा कॅप्टन रॉबिनसन याला चिखलदऱ्याचा शोध लागला. कालांतराने त्याने तेथे वसाहतही विकसीत केली. पुढे इ.स. १८५३मध्ये मेळघाटातील माखला, धुळघाट, मोहकोट, जामगड, रुपगड आणि खटकाली या परगण्यांवर ताबा मिळवून संपूर्ण मेळघाटवर ब्रिटीशांचे एकछत्री राज्य सुरू झाले.

त्या काळी मेळघाटात स्थलांतरीत शेती पद्धत अस्तित्वात होती. त्याचबरोबर सागवानादी वृक्षांची तोड करून त्याचा व्यापारही सुरू होता. त्यामुळे हळूहळू तेथील सागवानाचे नैसर्गिक जंगल लयास जाऊ लागले. हे लक्षात येताच ब्रिटिशांनी या जंगलाचे व्यवस्थापन करणे सुरू केले. त्यातूनच इ.स. १८६६मध्ये बैरागड आणि इ.स. १८७६मध्ये गुगामल या दोन आरक्षित वनांची निर्मिती मेळघाटात केली. नंतर इ.स. १८९३मध्ये मेळघाटात वन व्यवस्थापनाचा शास्त्रशुद्ध पाया घातला जाऊन येथील पहिला कार्य नियोजन आराखडा तयार करण्यात आला. या माध्यमातून मेळघाटात सागवान वृक्षाची पद्धतशीरपणे लागवड आणि तोड सुरू झाली.



मेळघाटातील सागवानाचे जंगल



गवा

## प्राणीसृष्टी

वन्यप्राण्यांच्या दृष्टीने मेळघाट अतिशय समृद्ध आहे. तथापि, अत्यंत उंचसखल प्रदेश, वन्यप्राण्यांची कमी घनता आणि त्यांचा लाजाळू स्वभाव यामुळे येथील वन्यप्राण्यांचे दर्शन सहज होत नाही. मात्र सेमाडोहच्या पर्यटनक्षेत्रात आणि गुल्लरघाट–नरनाळा परिसरातील निर्मनुष्य क्षेत्रात वन्यप्राण्यांचे सहज दर्शन होते.

मेळघाटात गवे, वानर आणि रानडुक्कर यांची संख्या जास्त आहे. त्यांचे मोठमोठाले कळप सर्वत्र आढळून येतात. तर सांबरांचे दर्शनही सहज होते. सपाटीचे जंगलप्रदेश येथे फारसे नसल्याने चितळांची संख्या मात्र कमी आहे. तर सतत सावध असणारे भेकर आणि चौसिंगा यांचे दर्शन अधूनमधून होत असते. मेळघाटात अस्वलांची संख्या मात्र बरीच जास्त आहे. विशेषतः चिखलदरा परिसरात ते सहज दिसू शकतात. शिकारी प्राण्यांमध्ये रानकुत्र्यांची झुंड अवचितच दृष्टीस पडते, तर अत्यंत रुबाबदार असलेला बिबट्या हा मेळघाटात कुठेही दृष्टीस पडतो. वाघांची संख्या येथे जरी चांगली असली तरी त्यांचे दर्शन मात्र दुर्लभ आहे. याशिवाय चांदी अस्वल, रानमांजर, खवल्यामांजर, उदमांजर, सायाळ, ससा, उडणारी खार असे निशाचर प्राणी येथे आहेत. परंतु ते क्वचितच दिसतात.



रानपिंगळा

पक्ष्यांच्या दृष्टीने मेळघाट मात्र भूतलावरील स्वर्गच! मोर, रानकोंबडा, तुरेवाला कोतवाल, नवरंग, टकाचोर, हळद्या, स्वर्गीय नर्तक, हरीयल, रातवा, सोनपाठी सुतार, सर्पगरुड अशा आणि इतर अनेक पक्ष्यांनी हे जंगल अत्यंत समृद्ध आहे. मेळघाटचे खास पक्षीवैभव म्हणजे भारतातून तब्बल ८३ वर्ष नामशेष झाला असे समजला गेलेल्या रानपिंगळ्याचे अस्तित्व! स्थानिक भाषेत याला डूडा संबोधले जाते. हा रानपिंगळा १९९७ साली पश्चिम सातपुड्याच्या तळोदा परिसरातील जंगलात आढळून आला. कालांतराने मेळघाटात याची प्रत्यक्ष नोंद घेतली गेली. आता यांची सर्वात जास्त संख्या मेळघाटातच आहे हे विशेष! हिवाळ्यात मेळघाटचे जंगल तर असंख्य स्थलांतरीत पक्ष्यांनी गजबजून जाते.



सर्पगरुड

**मेळघाटात आतापर्यंत सस्तन प्राण्यांच्या ८० प्रजाती, पक्ष्यांच्या २९४ प्रजाती, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ५५ प्रजाती, माशांच्या ९६ प्रजाती नोंदल्या गेल्या आहेत. मेळघाटातील वनांची संरचना दर किलोमीटर गणिक बदलत जाते. त्याबरोबर येथील जैवविविधताही बदललेली आढळून येते. हेच मेळघाटचे वैशिष्ट्य आहे!**


लेंडीया


मुरुडशेंग


रानहळद


कुसुम

# चित्रमय मेळघाट


इंगळी


भारंगी


वन विश्रामगृह, ढाकणा


काटेकोरांटी


वाळवीचे वारुळ


स्ट्राईप्ड टायगर


मलबार धनेश


सिग्नेचर स्पायडर


चॉकलेट पॅन्सी



निसर्गात जाण्यापूर्वी...
निसर्ग आपल्या पृथ्वीतलावरील सर्वात मोठी शाळा आहे.
त्यातील प्रत्येक घटकापासून आपण असंख्य गोष्टी शिकू शकतो.
निसर्गाचे संतुलित अस्तित्व टिकून राहिल्यास मानवाचे अस्तित्व टिकणार आहे, हे अंतिम सत्य आहे.
म्हणूनच निसर्गात जाताना निसर्गाचे पावित्र्य लक्षात घेऊनच तेथे जावयास हवे.
आपण तेथे निसर्गप्रेमी म्हणून जात आहोत, हेही लक्षात ठेवले पाहिजे.
आपल्या कोणत्याही वागणुकीमुळे निसर्गाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.
आपण अनुभवलेला हा निसर्ग आपणांस वारसा हक्काने मिळाला असून,
तो आपणास पुढील पिढीच्या हाती सुपूर्द करावयाचा आहे, हे पक्के लक्षात ठेवा!

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पात प्रवेश करताना अवश्य लक्षात ठेवा...

अभयारण्य हे निसर्ग आणि त्यातील सर्व घटकांना मानवांपासून अभय देण्यासाठीच निर्माण केले आहे. तेथे आढळणाऱ्या प्राण्यांचा तो शिल्लक राहिलेला अंतिम नैसर्गिक अधिवास आहे. आपण येथील वन्यप्राणी त्यांच्या नैसर्गिक अधिवासामध्ये त्यांचे नैसर्गिक जीवन कसे जगतात, हे पाहण्यास आला आहात. हे प्राणीसंग्रहालय नाही. त्यामुळे येथे आल्यावर सर्व वन्यप्राणी आपणास सहज दर्शन देतील हा भ्रम मनातून काढून टाका. येथे आपल्या निरीक्षणकौशल्यावर आणि वर्तणुकीवर बरेच काही अवलंबून आहे. आपण शांतपणे वावरल्यास वन्यप्राणीदर्शनाची शक्यता वाढू शकेल. शिवाय, नशिबाची साथही हवीच!

महत्त्वाचे म्हणजे आपण वन्यप्राण्यांचे निरीक्षण करण्यास आला आहात. आपल्या कोणत्याही कृतीमुळे या प्राण्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या. विशेषतः पाणवठ्याजवळ, शिकारीजवळ, पिल्ले असलेल्या प्राण्यांजवळ, पक्ष्यांचा घरट्यांजवळ वावरताना अधिक काळजी घ्या. अन्यथा, वन्यप्राण्यांशी केलेली अवाजवी जवळीक केव्हाही धोकादायक ठरू शकेल.

आपल्या सोबतचा मार्गदर्शक हा स्थानिक रहिवासी आहे आणि तो अनुभवसंपन्न आहे. त्याच्याशी सुयोग्य संवाद साधल्यास त्याच्याकडून येथील निसर्गाबद्दल आपणांस खूप काही समजू शकेल. म्हणूनच त्याच्या सूचनांकडे आणि माहितीकडे विशेष लक्ष द्या.

### हेही लक्षात ठेवा...

- आपला पोषाख शक्यतो अंगभर असावा. तो निसर्गाच्या रंगाशी एकरुप होणारा असावा.
- जंगलात जाताना सेंट, डीओ स्प्रे, सुवासिक तेल व फेसपावडर यांचा वापर मुळीच करू नका. मधमाशा अशा वासांकडे आकर्षित होऊ शकतात.
- सोबत उत्तम प्रतीची दुर्बिण, कॅमेरा, संदर्भ पुस्तक, नोटपॅड, पेन, पाण्याची बॉटल, कॅप, स्कार्फ आणि फर्स्टएड बॉक्स असल्यास उत्तम.

### हे करणे अत्यावश्यक आहे

१) संरक्षित क्षेत्रात प्रवेश करताना योग्य ते प्रवेशशुल्क भरून आवश्यक तो परवाना घेणे अनिवार्य आहे.
२) ज्यांच्या नावे प्रवेशशुल्क जमा केले आहे, त्यांनीच संरक्षित क्षेत्रात प्रवेश करणे अनिवार्य आहे.
३) आपल्या वाहनात अधिकृत मार्गदर्शक (गाईड) असणे अनिवार्य आहे.
४) कोणतेही शस्त्र, हत्यार, ज्वालाग्राही पदार्थ सोबत नेण्यास सक्त मनाई आहे.

## या नियमांचे पालन अवश्य करा

- आपल्या वाहनाचा कमाल वेग ताशी २० कि.मी. पेक्षा जास्त नसावा.
- आपल्या वाहनाने पुढील वाहनास चालत्या स्थितीत ओलांडू नये.
- रस्त्याखाली वाहन नेण्यास व उभे करण्यास सक्त मनाई.
- वाहनांचा हॉर्न, रिव्हर्स हॉर्न, रेडिओ, टेपरेकॉर्डर इ. वाजविण्यास सक्त मनाई.
- मोबाइल फोनच्या वापरावर सक्त मनाई.
- वाहनाच्या टपावर बसण्यास, खिडकीतून बाहेर चढून बसण्यास सक्त मनाई.
- वाहनातून कोणत्याही कारणास्तव खाली उतरण्यास सक्त मनाई.
- हा परिसर मानवनिर्मित कचराविरहित तसेच प्लॅस्टिकविरहित क्षेत्र असल्याने येथे कचरा, प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग, चॉकलेट वा इतर खाद्य पदार्थांची आवरणे, पाण्याच्या बाटल्या अथवा तत्सम कोणत्याही वस्तू टाकण्यास सक्त मनाई.
- मद्यपान तथा धूम्रपानास सक्त मनाई.
- वन्यप्राण्यांना कोणतेही खाद्यपदार्थ देण्यास सक्त मनाई.
- जंगलास वणवा लागेल असे कोणतेही कृत्य करण्यास सक्त मनाई.
- कोणत्याही वन्यप्राण्याच्या नैसर्गिक जगण्यावर व वावरण्यावर अडथळा आणण्यास सक्त मनाई.
- येथील नैसर्गिक अधिवासास धोका उत्पन्न होऊ शकेल अशी कोणतीही कृती करण्यास सक्त मनाई.
- येथून कोणतीही नैसर्गिक वस्तू, जसे फुले, पाने, फळे, काष्ठशिल्प, दगड वा इतर काहीही बाहेर नेण्यास सक्त मनाई.
- निर्धारित वेळेच्या आत संरक्षित क्षेत्राबाहेर येणे अनिवार्य.

**वरील नियमांचे उल्लंघन केलेले आढळल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२मधील तरतुदीनुसार गुन्हा समजला जाऊन सक्त कारवाई करण्यात येईल. पण अशी वेळ येणार नाही ही खात्री आहे.**

**आपला निसर्गसहवास अद्भुत अनुभूती देणारा आणि अविस्मरणीय होवो ही शुभेच्छा!**

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची संक्षिप्त माहिती

**हवामान** : हिवाळा कडक, किमान तापमान ५° सें.पर्यंत. उन्हाळा कडक, कमाल तापमान ४४° सें.पर्यंत.

**भेटीसाठी योग्य काळ** : जानेवारी ते एप्रिल.

**निवासव्यवस्था** : सेमाडोह व कोलकास येथे वनविकास महामंडळाचे निसर्ग पर्यटन संकुल (आरक्षण - www.fdcm.nic.in).
शहानूर येथे आकोट वन्यजीव विभागाचे निसर्ग पर्यटन संकुल (आरक्षण-वन्यजीव विभाग, अकोट)
चिखलदरा येथे म. रा. पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक संकुल (आरक्षण-www.maharashtratourism.gov.in)

**प्रवेशद्वार** : सेमाडोह, हरिसाल, बारुखेडा आणि खटकाली

**सफारी वेळ** : ऑक्टोबर ते मार्च - सकाळी ६.३० ते १०.३० आणि दुपारी २.३० ते ५.३०
मार्च ते जून - सकाळी ६.०० ते १०.०० आणि दुपारी ३.०० ते ६.३० (सफारीच्या वेळेत परिस्थितीनुरुप बदल संभवतो.)

**अंतर** : नागपूर ते अमरावती - १६५ कि.मी., अमरावती ते परतवाडा - ५० कि.मी., परतवाडा ते सेमाडोह - ५७ कि.मी.,
बडनेरा ते अमरावती - १० कि.मी., अकोला ते अकोट - ६० कि.मी., अकोट ते परतवाडा ५० कि.मी., अकोट ते शहानूर- ३० कि.मी.

**विमानतळ** : नागपूर **रेल्वे स्थानक** : बडनेरा आणि अकोला

**मेळघाट व्याघ्र प्रकल्प होळीचा सण आणि पाणवठ्यावरील वन्यप्राणी प्रगणनेच्या वेळी बंद असतो.**

### ● वाघांना वाचविण्यासाठी आपणही योगदान देऊ शकता ●

**वाघाची प्रजाती विलूप्त होण्याच्या मार्गावर आहे हे आपण जाणताच. यांच्या संरक्षणासाठी आता अथक आणि व्यापक प्रयत्नांची गरज आहे. व्याघ्र संरक्षण आणि संवर्धनासाठी आम्ही प्रयत्नशील आहोतच. तथापि आपल्याही सक्रिय सहभागाची आणि योगदानाची गरज आहे.**

**आपण आपले आर्थिक योगदान राज्य सरकारद्वारा नियंत्रित 'मेळघाट टायगर रिझर्व कॉन्झर्वेशन फाऊंडेशन, अमरावती' (बचत खाते क्रमांक ९१५०१०००२५७४२३१, ॲक्सिस बँक, शाखा अमरावती - IFSC UTIB0000265) यात देऊ शकता. ही देणगी आयकर अधिनियम कलम ८० (जी) अंतर्गत आयकर मुक्त आहे. अधिक माहितीसाठी कार्यकारी संचालक, मेळघाट टायगर रिझर्व कॉन्झर्वेशन फाऊंडेशन, द्वारा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, कॅम्प, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा. आपला सहयोग अत्यंत मोलाचा आहे!**

# मेळघाट व्याघ्र प्रकल्प




## INDEX

| | | |
|---|---|---|
| AREA UNDER PROJECT DIRECTORATE | | 2029.06 Sq. Km. |
| CRITICAL TIGER HABITAT (CORE AREA) | | 1500.50 Sq. Km. |
| BUFFER AREA | | 1268.03 Sq. Km. |
| ECO-TOURISUM ZONE | | 190.03 Sq. Km. |
| TOURIST COMPLEX | ⌂ | |




**क्षेत्र संचालक तथा मुख्य वनसंरक्षक**
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
कॅम्प, अमरावती, महाराष्ट्र - ४४४ ६०२.
दूरध्वनी : ०७२१२-२६६२७९२, २५५१७६६
E-mail : projecttigermelghat@gmail.com

**उप वनसंरक्षक**
गुगामल वन्यजीव विभाग,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
काष्ट आगर, परतवाडा,
जि. अमरावती, महाराष्ट्र.
दूरध्वनी : ०७२२३-२२२६४३
E-mail : dcfwlgugamal@gmail.com

**उप वनसंरक्षक**
सिपना वन्यजीव विभाग,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
काष्ट आगर, परतवाडा,
जि. अमरावती, महाराष्ट्र.
दूरध्वनी : ०७२२३-२२०२१४
E-mail : dcfwlsipna@gmail.com

**उप वनसंरक्षक**
अकोट वन्यजीव विभाग,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
पोपटखेडा रोड, अकोट,
जि. अकोला, महाराष्ट्र.
दूरध्वनी : ०७२५८-२०३३११
E-mail : dcfwlakot@gmail.com

**संकल्पना, मांडणी, छायाचित्र**
सुनील करकरे
निसर्ग अभ्यासक तथा वन्यजीव छायाचित्रकार,
कोल्हापूर. मो. : ९४२२०४४३९७



**निर्मिती** : वाईल्ड आयकॉन, कोल्हापूर

**प्रकाशक** : मेळघाट व्याघ्र प्रकल्प व मेळघाट टायगर कॉन्झर्वेशन फाउंडेशन, अमरावती

**प्रकाशन दिनांक** : २२ फेब्रुवारी, २०१५

**प्रती** : ३०००



पर्यटन क्षेत्रातील वाटेवरून जाणारे अस्वल!